# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( शिक्षण विभाग )

क्र. /1753 शि.वि. दि. 24/03/2014.

प्रति,

सर्व मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
मराठी / हिंदी / उर्दू, प्राथ. / उच्च प्राथ / माध्य. शाळा
म.न.पा., नागपूर.

शिक्षण विभाग
आवक क्र. 8441
दिनांक 24.3.14
महानगरपालिका, नागपूर

**विषय :– शाळांमध्ये "मुलीं करीता तक्रार पेटी" या प्रकल्पासाठी संबंधितांना दिशा-निर्देश देण्याबाबत.**

सध्या समाजात स्त्रिया व मुलींवर मोठया प्रमाणात शारीरिक शोषण व मानसिक त्रास, अत्याचार होण्याच्या घटनांमध्ये वाढ झालेली आहे. काही अत्याचार पिडीत मुली हया आपल्यावर झालेल्या अत्याचाराबाबत पोलिस स्टेशनला येवून तक्रार करतात. त्या तक्रारीची दखल घेवून कायदेशिर कारवाही करण्यात येते. काही अत्याचार पिडीत विद्यार्थीनी, स्त्रिया हे आपल्यावर झालेल्या अन्यायाची, भितीमुळे किंवा समाजातील बदनामीमुळे दाद मागत नाही व अन्याय सहन करतात. झालेल्या अन्यायाची तक्रार न दिल्याने त्याचेंवर अन्याय करणाऱ्या विरुध्द कायदेशीर कारवाही करता येत नाही व अन्याय करणारा पुन्हा असे कृत्य करण्यास धजावतो. वेळीच दखल घेतली गेल्यास त्याची पुन्हा पुनरावृत्ती होणार नाही व अन्यायग्रस्तांना न्याय मिळून त्याचा समाजात योग्य संदेश जावून मुलींमध्ये व समाजात सुरक्षिततेची भावना निर्माण होईल.

पोलिस स्टेशनला विद्यार्थीनी या बदनामीच्या भितीमुळे शोषणाबद्दल, त्रासाबद्दल वा अश्लिल शेरेबाजी बद्दल तक्रार देण्यास येत नाही. त्यांच्या या भावना कुठेतरी दबून राहतात. त्यांना कुठेतरी वाट मिळावी व अन्याय कर्त्यांविरुध्द योग्य कार्यवाही व्हावी. याकरीता त्याचे तक्रारी स्विकारणे गरजेचे आहे.

पोलिस स्टेशन सिताबर्डी, अंबाझरी, प्रतापनगर, एमआयडीसी, सोनेगाव, वाडी, या भागात ज्या शाळांमध्ये विद्यार्थीनी शाळेत येतात. त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची दाद मागण्यासाठी त्यांनी पो.स्टे. ला प्रत्यक्ष न जाता तक्रार आपल्या शाळेतच मुख्याध्यापक कक्षाच्या बाजूला पोलिस उपआयुक्त परिमंडळ क्र.1 व महाराजा अग्रेसन संस्थान, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमानाने एक तक्रार पेटी लावण्यात येईल व प्रत्येक आठवडयाला यातील तक्रारी संबंधित पोलिस स्टेशनचे अधिकारी त्या तक्रारीची योग्य दखल घेतील. तक्रारकर्त्यांचे नाव आवश्यकतेप्रमाणे गुप्त ठेवले जाईल. अशाप्रकारे मोहीम राबविण्याचा पोलिस प्रशासन व महानगरपालिकेचा मानस आहे.

या संकल्पनेला आपल्या स्तरावर सहकार्याची अपेक्षा असून आपल्या सर्व संबंधित मुख्याध्याकांनी सदर तक्रार पेटी आपल्या शाळेत लावून घ्यावात. तसेच या संकल्पनेची माहिती विद्यार्थी, शिक्षक व नागरीकांना देवून सदर योजनेबाबत जागृती निर्माण करावी.

अपर आयुक्त,
नागपूर, महानगरपालिका, नागपूर

**प्रतिलिपी :–**

1) पोलिस उपआयुक्त परिमंडळ क्र.1, नागपूर शहर.
2) उपायुक्त, नागपूर म.न.पा., नागपूर.
3) शिक्षणाधिकारी, म.न.पा., नागपूर.
4) महाराजा अग्रेसन संस्थान, नागपूर.

PC:2/D/Reshma/Letter 2.doc